# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date: 21 August 2024

Time: 7.10 to 7.20 AM

Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

**दिनांक: २१ ऑगस्ट २०२४ सकाळी ७.१० मि.**

****

***ठळक बातम्या***

- **डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसंबंधी उपाययोजना सुचवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाकडून राष्ट्रीय कृती दलाची स्थापना**
- **बदलापूर लैंगिक अत्याचार तपास प्रकरणी एसआयटीची स्थापना, खटला जलदगती न्यायालयात चालवण्यात येणार**
- **केंद्रीय लोकसेवा आयोगाकडून थेट पदभरतीची जाहीरात मागे**
- **परळी इथं आजपासून पाच दिवसीय राज्य स्तरीय कृषी प्रदर्शनाचं आयोजन**

**आणि**

- **मराठवाड्यात गेल्या दोन दिवसात जोरदार पाऊस, पुढील दोन दिवसांसाठी हवामान विभागाकडून यलो अलर्ट जारी**

***सविस्तर बातम्या***

देशभरातले डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसंबंधी उपाययोजना सुचवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयानं राष्ट्रीय कृती दलाची स्थापना केली आहे. या शीघ्र कृती दलात १४ सदस्यांचा समावेश असेल. कोलकात्यातल्या महिला डॉक्टरवर बलात्कार आणि हत्या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयानं स्वत: दखल घेत, काल सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्यीय पीठासमोर सुनावणी घेण्यात आली. न्यायालयाने सदर कृती दलाला तीन आठवड्यात हंगामी अहवाल आणि दोन महिन्यात अंतिम अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.

पीडित तरुणीचं नाव आणि छायाचित्र सार्वजनिक झाल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयानं चिंता व्यक्त करत, या प्रकरणी प्रथम माहिती अहवाल-एफआयआर उशीरानं का दाखल करण्यात आला, असा प्रश्नही उपस्थित केला आहे. या प्रकरणात सीबीआयनं केलेल्या तपासाचा अहवाल २२ ऑगस्ट पर्यंत सादर करण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत. तपासात राहिलेल्या त्रुटीबद्दल न्यायालयाने नाराजी व्यक्त केली. हत्येला आत्महत्या ठरवण्याचा प्रयत्न केला गेला, एफआयआरमध्ये हत्येचा उल्लेख केला गेला नाही, याबद्दल न्यायालयाने वैद्यकीय महाविद्यालय प्रशासन आणि पोलिसांना जाब विचारला आहे. याबाबतची पुढील सुनावणी उद्या २२ ऑगस्टला होणार आहे.

****

ठाणे जिल्ह्यात बदलापूर मधल्या आदर्श महाविद्यालयात दोन विद्यार्थिनींच्या लैंगिक अत्याचाराच्या घटनेनंतर संतप्त पालकांनी काल बदलापूर रेल्वे स्थानकात रेल रोको आंदोलन केलं. यावेळी पोलिसांनी सौम्यबळाचा वापर केला, त्यावेळी आंदोलकांनी दगडफेक केल्यानं आंदोलनाला हिंसक वळण लागलं. पालकांनी आदर्श महाविद्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळही आंदोलन केलं.

दरम्यान, या प्रकरणी संशयित आरोपीस ताब्यात घेण्यात आलं आहे. शाळेच्या मुख्याध्यापिकेला निलंबित करण्यात आलं असून, मुलांची जबाबदारी असलेल्या दोन सेविकांना सेवेतून कमी करण्यात आलं आहे. तसंच संस्थाचालकांविरुद्ध कडक कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत. तसंच याप्रकरणी संबंधित पोलीस निरीक्षकांची देखील तत्काळ बदली करण्यात आली आहे.

****

दरम्यान, या प्रकरणी आरोपीला कडक शासन करण्यात येईल, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं आहे. अशा प्रकरणात प्रसंगी संस्थाचालकांवर देखील कारवाई करण्यात येईल, असं ते म्हणाले.

उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, हा खटला जलदगती न्यायालयात चालवण्यात येणार असून, यात विशेष सरकारी वकील म्हणून ज्येष्ठ विधीज्ञ उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचं सांगितलं. या घटनेची चौकशी करण्यासाठी पोलिस महानिरीक्षक दर्जाच्या वरिष्ठ आयपीएस अधिकारी आरती सिंग यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक एसआयटी गठित करण्याचे फडणवीस यांनी आदेश दिले. ते म्हणाले...

**आम्ही तात्काळ सिनियर आय पी एस ऑफिसर आरती सिंह, ज्या आय जी लेवलच्या अधिकारी आहेत, त्यांना नियुक्त केलेलं आहे. महिला आय पी एस अधिकाऱ्याच्या अंतर्गत ही चौकशी व्हावी, अशा प्रकारची भावना याच्या पाठीशी आहे. त्याचप्रमाणे पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत जी काही कार्यवाही तातडीने केली पाहिजे, ती कार्यवाही देखील केली जाते आहे. कुठल्याही परिस्थितीमध्ये अशा नराधमांना तात्काळ शिक्षा व्हावी, अशा प्रकारचा प्रयत्न हा राज्य सरकारचा आणि पोलीस विभागाचा असेल.**

****

राज्यातल्या सर्व शाळांमध्ये विशाखा समिती स्थापन करणं बंधनकारक करण्यात येत असल्याचं, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी सांगितलं आहे. बदलापूर प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर, मंत्रालयात घेण्यात आलेल्या शिक्षण विभागाच्या बैठकीनंतर ते बोलत होते. शाळांमध्ये या समित्या स्थापन झाल्या नसतील तर संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असं त्यांनी सांगितलं. मुलींच्या तक्रारींची दखल घेण्यासाठी ई बॉक्ससोबतच शाळेत तक्रार पेटीही बंधनकारक केली जाणार असल्याचं केसरकर यांनी सांगितलं.

****

राज्यात शक्ती कायदा आणण्यासाठी आमच्या सरकारच्या काळात मसुदा तयार केला, तो या सरकारनं मंजूर करून शक्ती कायदा तयार करावा, असं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे. ते काल मुंबईत माध्यमांशी बोलत होते. तर बदलापूर घटनेतल्या गुन्हेगारांना कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली आहे.

****

केंद्रीय लोकसेवा आयोगाने जाहीर केलेली विविध पदांवरची थेट भरती, लॅटरल एन्ट्रीची जाहीरात मागे घेतली आहे. ही जाहीरात रद्द करावी अशी सूचना, केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी लोकसेवा आयोगाच्या अध्यक्ष प्रीती सुदन यांना केली होती. २०१४ पूर्वी अनेक पदांवर अशाच प्रकारे भरती करण्यात आली होती. मात्र, अशाप्रकारच्यार पदभरतीत आरक्षणाची तरतूद नाही, त्यामुळे लोकसेवा आयोगानं ही जाहीरात रद्द करावी, असं जितेंद्र सिंह यांनी म्हटलं होतं.

****

राज्यसभेच्या पोटनिवडणूकीसाठी भारतीय जनता पक्षानं राज्य निहाय उमेदवारांच्या नावांची घोषणा केली आहे. यामध्ये महाराष्ट्रातून धैर्यशील पाटील यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. पक्षाचे राष्ट्रीय महासचिव अरुण सिंह यांनी याबाबतचं पत्रक काल जारी केलं.

****

***या बातम्या आकाशवाणीच्या छत्रपती संभाजीनगर केंद्रावरुन देत आहोत.***

****

बीड जिल्ह्यात परळी वैजनाथ इथं आजपासून पाच दिवसीय राज्यस्तरीय कृषी महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. या महोत्सवात कृषी प्रदर्शन, पशुप्रदर्शन, कृषी विद्यापीठ दालन, परिसंवाद, चर्चासत्र, उत्पादक ते ग्राहक थेट विक्री केंद्र, आधुनिक कृषी अवजारं प्रदर्शन, स्वंयसहाय्यता महिला बचत गट निर्मित वस्तू पदार्थांची विक्री तसंच प्रदर्शन असे विविध उपक्रम राबवण्यात येणार आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंग चौहान प्रदर्शनाला उपस्थित राहणार आहेत.

****

हिंगोली जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी काल हिंगोली इथं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातर्फे आंदोलन करण्यात आलं. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. संपूर्ण कर्जमाफी करून सातबारा कोरा करावा, पीक विमा शेतकऱ्यांच्या खात्यात त्वरित जमा करावा, पीक कर्ज वाटप करावं, सोयाबीनला सात हजार तर कापसाला पंधरा हजार रुपये हमीभाव द्यावा यासह इतर मागण्यांचं निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आलं.

****

धाराशिव तालुक्यात भिकारसारोळा या गावात आढळलेला रुग्ण हा पोलिओचा रुग्ण नसल्याचं, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर हरिदास यांनी स्पष्ट केलं आहे. चालू वर्षी जुलै अखेरपर्यंत असे १३ रुग्ण आढळून आले, परंतु तपासणीअंती त्यापैकी कोणीही पोलिओबाधित आढळलेलं नाही, त्यामुळे नागरिकांनी या रुग्णाबाबत संभ्रम बाळगण्याची आवश्यकता नाही, असं डॉक्टर हरिदास यांनी सांगितलं. पोलिओ संशयित शोधणं हा नियमित सर्वेक्षणाचा भाग असल्यानं नागरिकांनी घाबरून जाऊ नये, असं आवाहन सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत करण्यात आलं आहे.

****

मराठवाड्यात गेल्या दोन दिवसात सात जिल्ह्यातल्या २२ मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली. आतापर्यंत विभागात ७३ पूर्णांक पाच मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. छत्रपती संभाजीनगर शहरासह जिल्ह्यात काल चांगला पाऊस झाला. दुपारी काही वेळ मुसळधार पाऊस झाल्यानंतर रात्रभर पावसाची संततधार सुरु होती. जिल्ह्यातल्या तुर्काबाद, चिकलठाण्यासह जालना, बीड, धाराशिव, नांदेड जिल्ह्यातल्या अनेक भागात काल जोरदार पाऊस झाला.

दरम्यान, येत्या दोन दिवसात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी, तर मराठवाडा आणि विदर्भात अनेक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. याकाळात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

****

परभणी जिल्ह्यात मतदार यादीच्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमाअंतर्गत काल पाथरी इथल्या महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालय आणि संस्कार महाविद्यालयात विद्यार्थ्यांना मतदार नोंदणी बाबत सविस्तर माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी आपल्यासह कुटुंबातल्या सदस्यांची नाव नोंदणी नसल्यास ती करुन घेण्याचं आवाहन उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी शैलेश लाहोटी यांनी केलं.

****

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या प्रोत्साहनपर लाभासाठी लातूर जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण करण्याचं आवाहन, सहकारी संस्थेच्या जिल्हा उपनिबंधकांनी केलं आहे. या योजनेअंतर्गत जे शेतकरी लाभासाठी पात्र ठरले आहेत त्यांना विशिष्ट क्रमांक देण्यात आलेला आहे.

****

ब्राह्मण समाजासाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात यावं, या प्रमुख मागणीसाठी जालना इथल्या गांधीचमन चौकात आमरण उपोषणाला बसलेले दीपक रणनवरे यांची आज माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी भेट घेतली. समाजाच्या मागण्यांबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन चर्चा करू, असं आश्वासन दानवे यांनी यावेळी दिलं.

****